# <u>फेर जाहीर नोटीस</u>

मे. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग—ओरोस व त्यांचे अधिपत्त्याखालील येणा—या दिवाणी न्यायालय(क.स्तर), कुडाळ, दोडामार्ग या न्यायालयातील वॉटर कुलर व प्युरीफायर नग ५ तसेच दिवाणी न्यायालय(क.स्तर), देवगड या न्यायालयातील वॉटर प्युरीफायर सुस्थितीत राहाणेसाठी त्यांची वार्षिक देखभाल व आवश्यक दुरुस्ती करणेसाठी इच्छुक पुरवठादार यांचेकडुन म.जा.क्र.२७०९/२०२४, दि.१५/०५/२०२४ अन्वये दरपत्रके मागविणेत आलेली होती. तथापि, दिलेल्या मुदतीत एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही.

सबब, याद्वारे सदर दरपत्रके सादर करणेची मुदत दि.११/०६/२०२४ पर्यंत वाढविणेत येत आहे.

**<u>अटी व शर्ती</u>** :

१) दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग, मु.ओरोस यांचे नावे असावे. लखोटयावर **"वॉटर कुलर व प्युरीफायरची वार्षिक देखभाल दुरूस्ती करीता दरपत्रक"** असा उल्लेख करणेत यावा.

२) वार्षिक देखभाल व दुरूस्तीविषयक करार हा १ वर्षाचे कालावधीकरीता असेल.

३) वार्षिक देखभाल व दुरूस्तीविषयक करार करणा—या पुरवठादार यांनी वॉटर कुलर व प्युरीफायर बाबत तक्रार नोंद करणेकरीता आपले संपर्क क्रमांक पुरवावयाचे असून, प्राप्त झालेल्या तक्रारींची त्वरीत दखल घेऊन तक्रारींचे निवारण २ दिवसांचे आत करावयाचे आहे.

४) दरपत्रक सादर करणा—या पुरवठादार यांची वस्तू व सेवा करांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

५) करार करणेबाबतचा सर्व खर्च हा यशस्वी दरपत्रकदार यांनी स्वत: करावयाचा आहे.

६) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमूद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवज तयार करणेकामी, दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, पासबुकची पहील्या पानाची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) वर नमूद न्यायालयांच्या कार्यालयातील वार्षिक देखभाल व दुरूस्तीविषयक कराराबाबतचे देयक दर तिन महिन्यांचे कालावधीनंतर या कार्यालयात सादर करावयाचे आहे. सदर कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयाची यंत्रे दुरूस्तीविषयक तक्रार प्रलंबित असल्यास त्या कालावधीचे देयक अदा केले जाणार नाही व याबाबत कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. देयकाची रक्कम अदा करताना राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून अदा करणेत येईल.

८) जाहीर नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

९) जर निविदा प्रक्रियेत कमीत कमी ३ वैध व्यापारी निविदांचे मूल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर, अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग–ओरोस यांचा राहील.

१०) सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल.

तरी, इच्छुकांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दहा दिवसांच्या आत** आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग, मु.ओरोस येथे सादर करावीत.

दिनांक :– ३०/०५/२०२४

प्र. सहा. अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

म.जा.क्र.ग्रंथा./१८६७ सन २०२४
जिल्हा न्यायालय,सिंधुदुर्ग ओरोस
दिनांक :– ३०/०५/२०२४

प्रत माहितीसाठी व जरूरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई–मेलद्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नोटीसबोर्डवर तसेच संकेतस्थळावर
८. डी.एस्.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता